महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एनजीपी/पदविका/औ.शा. मान्यता/२०२२-२३/ १०५२ दिनांक : 29 NOV 2022

प्रति,
संचालक/ प्राचार्य,
औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संबंधित संस्था,
महाराष्ट्र राज्य

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राज्यातील विद्यमान विनाअनुदानित पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थेत नविन विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रम सुरु करणे तसेच विद्यमान विनाअनुदानित संस्थांच्या नावात तसेच संस्थेच्या पत्त्यात बदल करण्यास फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन दिलेल्या शासन मान्यतेच्या अनुषंगाने संचालनालयाची मान्यता देण्याबाबत...**

**संदर्भ : १. या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/२०२२-२३/७००, दिनांक : १०.८.२०२२.**
**२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०२२/(प्र.क्र.९०/२२)/तांशि-५, दिनांक : २८.११.२०२२.**

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या मान्यतेस अनुसरुन शासनाने संदर्भ क्रमांक २ वरील शासन निर्णयान्वये, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासुन राज्यातील विद्यमान विनाअनुदानित पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नविन विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रम सुरु करणे तसेच विद्यमान विनाअनुदानित संस्थांच्या नावात व पत्त्यात बदल करण्यास शासन मान्यता दिलेली आहे. तरी, सदर शासन मान्यतेच्या अनुषंगाने संचालनालयाची मान्यता घेण्यासाठी संदर्भ क्रमांक १वरील संचालनालयाच्या परिपत्रकामध्ये सूचित केल्याप्रमाणे मान्यतेसाठी नस्ती आवश्यक कागदपत्रांसह सादर करावी.

संबंधित संस्थांनी संदर्भ क्र.१ च्या पत्रासोबतच्या विवरणपत्र-अ मध्ये नमूद कागदपत्रांच्या व सॉफ्ट कॉपीसह या संचालनालयास सादर करुन मान्यता घेण्यात यावी, अन्यथा संबंधित अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशाबाबत संबंधित संस्थांना काही समस्या उद्भवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित संस्थांची राहील, यांची नोंद घ्यावी.

**(संजय पवार)**
सहा.संचालक (अतां.),
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रतः १. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद/मुंबई/ नाशिक/पुणे, त्यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागातील कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित संस्थांना आपले स्तरावरुन सदर परिपत्रक अग्रेषित करण्यात यावे. तसेच ज्या संस्थांनी त्यांचे अर्जासाठी शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४, दिनांक : २२.२.२०१८ अन्वये विहित नोंदणी शुल्क आपले कार्यालयास अदा केले नसल्यास ते त्यांचेकडून वसुल करण्यात यावे.

२. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई, यांना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राज्यातील विद्यमान विनाअनुदानित पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रम सुरु करणे, विद्यमान विनाअनुदानित पदविका संस्थांच्या नावात तसेच संस्थेच्या पत्त्यात बदल करण्यास फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासन मान्यता देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२२/(प्र.क्र.९०/२२)तांशि-५**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २८ नोव्हेंबर, २०२२

<u>संदर्भ</u> :- १) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/एडीएम/ पत्ता - नाव बदल/पीसीआय मान्यता/ २०२२/ ९१३, दि.३१.१०.२०२२.
२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/डी.फार्म./पीसीआय मान्यता/२०२२/९९४, दि.१५/११/२०२२.

<u>प्रस्तावना</u> :-

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राज्यातील विद्यमान विनाअनुदानित पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रम सुरु करणे, विद्यमान विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्थांच्या नावात तसेच पत्त्यात बदल करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये त्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर केलेले आहेत.

**शासन निर्णय :-**

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सोबत जोडलेल्या **प्रपत्र-अ, प्रपत्र-ब व प्रपत्र-क** मध्ये नमूद संस्थांना अनुक्रमे विद्यमान विनाअनुदानित पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रम सुरु करणे तसेच विद्यमान विनाअनुदानित औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या नावात बदल तसेच विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थेच्या पत्त्यात बदल करण्यास शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.
२. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/ फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.
३. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता विवरणपत्रातील त्यांच्या नावासमोर नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.
४. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/ फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकाररित्या करण्यात येईल.
५. सदर पदविका अभ्यासक्रमांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे.

६. नव्याने मान्यता देण्यात आलेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थाप्रमुखांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील. सदर मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उदभवल्यास याप्रकरणी संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहतील. तसे हमीपत्र संबंधित संस्थाप्रमुखांनी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करावयाचे आहे. त्यानंतरच सदर संस्थांना अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संचालनालयाने संमती द्यावयाची आहे.

७. संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे आवश्यक ते प्रक्रिया शुल्क व संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

८. सदर व्यावसायीक पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

९. अभ्यासक्रमांची शुल्क निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ शासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या प्राधिकरणामार्फत विहीत करण्यात येईल.

१०.शुल्क नियामक प्राधिकरण/शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या प्रधिकरणामार्फत विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

११.संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१२.संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांचे मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

१३.सदर संस्था, संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१४.रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१५.याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१६.ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे शासनाने विहीत केलेले नोंदणी शुल्क अदा केलेले नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ते वसूल करावे. या शासन मान्यतेनुसार नवीन अभ्यासक्रमांचा समावेश शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या प्रवेश प्रक्रियेत करण्याची कार्यवाही संचालक, तंत्रशिक्षण यांनी त्वरीत करावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२११२८१३०४३८२००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL RAGHUNATH KATKAR

Digitally signed by ANIL RAGHUNATH KATKAR [illegible]

**(अ. र. काटकर)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
३. संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. सर्व संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, कम्बाइन्ड काऊन्सिल्स बिल्डिंग, कोटला रोड, एजवान-इ-गालिब मार्ग, नवी दिल्ली-११० ००२.
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली.
९. विभागीय अधिकारी, पश्चिम विभागीय कार्यालय, एआयसीटीई, दुसरा मजला, इंडस्ट्रियल रिसर्च बिल्डींग, नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रियल इंजिनिअरींग (इनआयटीआयई) कॅम्पस, विहार लेक, पवई, मुंबई - ४०००८७.
१०. निवड नस्ती/तांशि-५.

**शासन निर्णय क्र.2022/(प्र.क्र.90/22)तांशि-5 दि. 28 नोव्हेंबर 2022 सोबतचे**

**प्रपत्र-अ**

**List of D. Pharmacy Course in Existing B. Pharmacy (Un-aided) Institute, Approved by PCI from A.Y. 2022-23.**

| Sr. No. | DTE Code | PCI Code | Institute Name and Address | Institute Status (Aided/ Un-aided) | Institue Autonomy Status | Institue Minority Status | District Name | Region Name | Program Name | Affiliating Board/ University | Course Name | Course Status | Intake Approved by PCI A.Y. 2021-22 | Intake Approved by PCI A.Y. 2022-23 | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2590 | PCI-3187 | DJP's College of Pharmacy, 2, NH222, Pathri Road, At Pohetakli, Tq. Pathri, Dist. Parbhani-431506 | Un-aided | Non-Autonomous | Non-Minority | Parbhani | Aurangabad | Post H.S.C. Diploma in Pharmacy (D. Pharm) | Maharashtra State Board of Technical Education | Pharmacy | Un-aided | 0 | 60 | D. Pharmacy Course in existing B. Pharmacy Institute |
| 2 | 5185 | PCI-1612 | Pravara Rural Education Societys Pravara Rural College Of Pharmacy, Pravaranagar, Loni, Tal. Shrirampur, Dist. Ahmednagar- | Un-aided | Non-Autonomous | Non-Minority | Ahmednagar | Nashik | Post H.S.C. Diploma in Pharmacy (D. Pharm) | Maharashtra State Board of Technical Education | Pharmacy | Un-aided | 0 | 60 | D. Pharmacy Course in existing B. Pharmacy Institute |

शासन निर्णय क्र.मान्यता २०२२/(९०/२२) तांशि-५, दि.२८ नोव्हेबर २०२२ सोबतचे

प्रपत्र -ब

**List of Change in Name of Un-aided D. pharmacy Institute, Approved by PCI from A.Y.2022-23.**

| Sr. No. | DTE Code | PCI Code | Institute Name | New Name Of Society/ Trust/ Institute |
|---|---|---|---|---|
| 1 | 5429 | PCI-1292 | Mahatma Gandhi Vidyamandir's Institute of Pharmacy D Pharmacy, MSG Campus, LVH Marg, Malegaon Camp, Nashik,-423105. | Nimgaon Gramin Shikshan Prasarak Mandal's Institute of Pharmacy D. Pharmacy |

**शासन निर्णय क्र.मान्यता २०२२/(९०/२२) तांशि-५, दि.२८ नोव्हेंबर २०२२ सोबतचे**

**प्रपत्र -क**

**List of Change in Address of Un-aided D. Pharmacy Institute, Approved by PCI from A.Y.2022-23.**

| Sr. No. | DTE Code | PCI Code | Institute Name | Old Address of Institute | New Address of Institute |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 6516 | PCI-1146 | Krishna Charitable Trust's Krishna College of Pharmacy | Krishna Hospital Campus, Dhebewadi Road, Malkapur, Karad (V), Karad (M), Satara (D), Maharashtra (S)-415539 | 144/B, Dhebewadi Road, At Post Malkapur, Tal. Karad Dist-Satara, Malkapur (V), Karad (M), Satara (D), Maharashtra (S)-415539 |
| 2 | 5267 | PCI-1132 | Kisan Vidhya Prsarak Sansthas M A H College of Pharmacy | A/P Boradi, Boradi, Boradi (V), Shirpur (M), Dhule (D), Maharashtra (S)- 425428. | Gat 123/5A and 5B, SPDM College Campus, Shingave shivar, Shirpur (V), Shirpur (M), DHULE (D), Maharashtra(S)-425405 |